10

Impact Factor
5.604
www.sjifactor.com

ISSN p-2454-7409
Vol. 5 Issue 1
Jan. 2020
Regular Issue

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष पाचवे अंक पहिला जानेवारी २०२०

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

**Peer Reviewed Annual National Indexed Research Journal in Marathi**

**Published as per UGC (India) Guidelines**

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Published By
**DBMRC**
**INDIRA MAHAVIDYALAYA**
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

236

CS CamScanner

Impact Factor 5.604

p-ISSN 2454-7409

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

## (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 5 ISSUE 1 January 2020
वर्ष पाचवे, अंक पहिला, जानेवारी २०२०
URL
www.indiramahavidyalaya.com/IssuesFolder.php?q=MPSP%202020%20Vol.%205%20Issue%201

मुख्य संपादक
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

सहसंपादक व प्रकाशक
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

संपादक मंडळ **Editorial Board**

डॉ. राजू आदे, प्रा. रेखा वाठ, डॉ. गणपत उरकुंदे, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे

1. **Dr. R.T. Ade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rajuade2512@gmail.com Mobile No.: 9422608715
2. **Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: 9422153353
3. **Dr. G.P. Urkunde,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: urkundeganpat@gmail.com Mobile No.: 9765034097
4. **Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: 9923909296
5. **Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: 9420199479

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

237

CS CamScanner

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★



# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय | डॉ. पवन मांडवकर | 4 |
| 1 | सण उत्सवाच्या स्त्री लोकगीतांमधून उमटणारी देशीयता | डॉ. अतुल चौरे | 5-9 |
| 2 | मूर्तिपूजा राष्ट्रसंतांचा दृष्टिकोन | डॉ. प्रवीण कारंजकर | 10-12 |
| 3 | संत सावता माळी | डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 13-16 |
| 4 | महादेवाच्या गाण्यातील सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक संदर्भ | डॉ. म.ह. खोडे | 17-21 |
| 5 | घर याचे हृदयी माझ्या : सामाजिक, सांस्कृतिक आशय सांगणारी कविता | प्रा. मिलिंद शिवाजी कांबळे | 22-24 |
| 6 | भारतीय भक्ती चळवळ आणि लोकभाषा यांचा अनुबंध | डॉ. उज्ज्वला वंजारी | 25-27 |
| 7 | संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील प्रारब्धवाद | डॉ. रेखा वडिखाये | 28-31 |
| 8 | स्वाती चांदोरकरांच्या कथेतील नियती शरण नायिकांचे चित्रण | प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे | 32-34 |
| 9 | मराठी भाषेवरील फार्सी भाषेचा प्रभाव : एक अनुबंध | प्रा.डॉ. लिंगायत विशाल प्रकाश | 35-38 |
| 10 | मराठी साहित्यात प्रतिबिंबित 'मानवतावाद' | प्रा.डॉ. विजय रुपराव राऊत | 39-43 |
| 11 | समन्वयकार संत नामदेव महाराज | डॉ. अशोक भक्ते | 44-48 |
| 12 | आदिवासी साहित्य आणि श्रमसंस्कृती | प्रा.डॉ. कृष्णा महादू भवारी | 49-52 |
| 13 | वेदनेतून निर्माण होऊन विद्रोहाकडे जाताना स्वत:चे अस्तित्व निर्माण करणारा प्रतिभेचा प्रवाह म्हणजे दलित साहित्य | डॉ. रमाकांत विठ्ठल ईटेवाड | 53-57 |
| 14 | वैदर्भीय संतांचे पसायदान आणि त्यांचे युगभान | डॉ. संजय मो. पाटील | 58-62 |
| 15 | शंकर पाटील यांचा 'गारवेल' कथासंग्रह एक आकलन | प्रियंका आकाश राऊत | 63-66 |
| 16 | विलास अंभोरे यांच्या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा | प्रा. तुकाराम कांबळे | 67-69 |
| 17 | नव्वदोत्तरी कादंबरीतील वास्तव स्त्रीजीवन (सदानंद देशमुख यांच्या 'तहान' व 'बारोमास' संदर्भात ) | डॉ. वर्षा गणगणे | 70-73 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचा आढावा | प्रा. डॉ. संजय के. लाटेलवार | 74-79 |
| 19 | ग्रामीण कवितेतील जागतिकीकरण | डॉ. अशोक रा. इंगळे | 80-84 |
| 20 | अविनाशी फुले | शिवाजी रघुनाथ मोतीबोणे | 85-90 |
| 21 | 'महात्मा' सर्जनशील लेखकाची संशोधनात्मक कादंबरी | प्रा. डॉ. विनोद राठोड | 91-94 |
| 22 | स्त्री- प्रतिमा आणि प्राचीन मराठी साहित्य | प्रा. कविता राजाभोज | 95-98 |


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, P...



238

CS CamScanner

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

# सण उत्सवाच्या स्त्री लोकगीतामधून उमटणारी देशीयता

डॉ. अतुल नारायण चौरे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
औंध, ता. हवेली, जि. पुणे. महाराष्ट्र (India)
इ मेल choureatul.paru@gmail.com भ्रमणध्वनी ८६९२०८०२१० / ८१६९४२४५१७

## प्रस्तावना :–

भारतीय संस्कृतीमध्ये सण–उत्सवांना अत्यंत मानाचे आणि सन्मानाचे स्थान आहे. त्यामुळेच इतर परकीय देशांपेक्षा भारतात सण उत्सवांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. पूर्वीच्या काळी ग्रामीण स्त्री जीवनात सण–उत्सवांना अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. १९९० नंतरच्या जागतिकीकरणातही ह्या सण–उत्सवांना स्त्री जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसते. कारण त्या निमित्ताने तिला मोकळा श्वास घेता येतो. एरवी ती कामात गुरफटलेली असते. सण–उत्सवानिमित्त स्त्रियांना माहेरी जायला मिळते. त्यामुळे अनेक स्त्रिया अशा सण–उत्सवांची आतुरतेने वाट पाहताना दिसतात. सण–उत्सवाच्या स्त्री लोकगीतांमधून देशीयतेचे चित्रण घडताना दिसते. एवढेच नव्हे तर संबंध लोकवाङ्मयातून देशीयतेचे चित्रण घडत असते. ह्यासंदर्भात मधुकर वाकोडे ह्यांचे विधान विचारात घेण्यासारखे आहे. ''लोकधर्मीय परंपरा, लोकव्यवहार, रूढी–परंपरा आणि प्रदेशविशिष्ट संस्कृतीचे सर्व घटक देशीयतेच्या मूळ सेंद्रीय तत्त्वावर पोसलेले असतात. देशीयतेचा पुरेपूर कस असलेली ही लोकसंस्कृती स्वाभाविकपणे जगते आणि ती निसर्गाला अधिक जवळची असते. ज्या मातीतून ही संस्कृती अंकुरलेली असते. त्या मातीचे रंगगंध तिच्यात सामावलेले असतात. त्या भूमिपट्ट्यातील माणसांची मुळेदेखील त्या मातीतच रूजलेली असतात. (परकीय किंवा शिष्ठ नागरी संस्कारापासून ही संस्कृती अलिप्त असते.) अलिखित शिष्टाचार आणि सामाजिक संकेत पाळणारा हा वर्ग देशीय जाणिवांवर भाळणारा असतो. या ज़ाणीवा देशी–विदेशी वगैरे त्यास कळत नसते, पण त्यांच्या अंत:करणाला सर्व भावत असते. लोकगीतांमधून ज्या आदिम–लोकसंस्कृतीचे दर्शन घडते ते प्रकृतीचे स्पंदन असते. परिणामी, समग्र लोकवाङ्मयच देशीय जाणिवांचा उत्कट अविष्कार असते.''[१] यावरून आपणास स्त्री लोकगीते आणि देशीयतेचा अनन्यसाधारण संबंध असलेला दिसतो. मुळातच मौखिक स्वरूपाच्या लोकवाङ्मयामधून देशीयतेच्या खुणा आढळतात. हया संदर्भात सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे पाहता येते.

## देशीयतेची संकल्पना :–

मराठी साहित्यविश्वामध्ये देशीयतेची संकल्पना साधारणपणे १९८० च्या दरम्यान आलेली दिसते. देशीयता हया संकल्पनेवर १९८० दरम्यान विविध चर्चा आणि लेखन व्हायला लागलेले असले तरी, देशीयतेच्या खुणा सुरुवातीच्या मराठी साहित्यात आढळतात. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात लेखन करणारे लोकहितवादी, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी हे सर्वजन देशीयतेचाच पुरस्कार करताना दिसतात. परकीय मालावर टाकलेला बहिष्कार हासुद्धा एकप्रकारे देशीयतेचाच प्रकार आहे. १९६० नंतरच्या विविध वाङ्मयीन प्रवाहामधूनही देशीयतेच्या पाऊलखुणा पहायला मिळतात. उदा. ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, महानगरीय इतर प्रवाहामधून आपणास देशीयतेचे चित्रण घडते. मराठी साहित्यामधून आजपर्यंत मानवी जगण्याचे चित्रण आलेले आहे. साहित्यामधून देशीयतेचे चित्रण घडते. मराठी साहित्यामधून आजपर्यंत मानवी जगण्याचे चित्रण आलेले आहे. साहित्यामधून देशीयतेचे चित्रण करताना लेखकाने मूल्यांचाही विचार करायला हवा. कारण चांगली मूल्ये असतील तरच समाज विकासाच्या दिशेने प्रवास करू शकेल. ह्यासंदर्भात लेखकाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात की, ''लेखकाच्या स्वत्वाच्या जाणिवेबरोबरच परंपरा आणि संस्कृतीसंबंधीची विवेकशील आणि मूल्यगर्भ जाणीव येथे प्रकट होते. आणि माणसाचे माणूसपण अधोरेखित होण्याच्या दृष्टीने श्रेष्ठतर मूल्यांना ध्यास जेथे घेतला जाऊ शकतो तेथेच देशीयता अवतरू शकते, असे म्हणता येईल. म्हणजेच बहुजनांच्या शोषण मुक्तीचा विचार जेथे प्रधान असतो तेथील देशीयताच अर्थपूर्ण ठरू शकते. एरवी नुसत्याच परंपरा आणि संस्कृतीचे सांगाडे आम्ही नाचवीत बसू!''[२] यावरून आपणास असे दिसते की, देशीयतेचे अस्सल मराठी साहित्य जन्माला



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★
239
CS CamScanner

यायचे असल्यास लेखकाला महत्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागते. लेखकाने लेखन करताना प्रथा–परंपरांचा विचार तर करावाच पण त्यामधून माणसाचे माणूसपण अधोरेखित करायला हवे. मानवी विकासाच्या दृष्टीने मानवाच्या शोषणमुक्ततेचा विचार करून, समतेचा विचार मांडायला हवा.

१९व्या शतकामधील समाजसुधारकांनी आपणाला ही नवी दृष्टी दिलेली आहे. ह्या संदर्भात नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात की, ''म.जोतिबा फुले, म.गांधी, कार्ल मार्क्स आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यासारखे जीवनाकडे पाहण्याची वेगळीच दृष्टी देणारे महापुरूष असतील, या महापुरुषांनी आम्हाला आमच्या परंपरांकडे, संस्कृतीकडे, समाजाकडे आणि पर्यायाने स्वत:कडेच कसे पहावे ते शिकविले आणि त्यातून समाज जीवनात, वेगवेगळ्या आत्मभान देणाऱ्या चळवळी उदयाला आल्या. परंपरा आणि संस्कृतीकडे विवेकशील दृष्टीने आणि मूल्यात्मक जाणिवेने पहावयास शिकविले. परिणामत: वाङ्‌मयाचा वेगळा विचार केला पाहिजे याचे भानही आम्हाला आले आणि या सगळ्या प्रक्रियेतच देशीयतेच्या जन्मखुणा आहेत.''[३] देशीयता–देशीयता म्हणजे काय? हे सर्वप्रथम समजून घ्यायला हवे, कारण देशीयता म्हणजे फक्त वर–वर दिसणाऱ्या, असणाऱ्या गोष्टी नव्हेत. देशीयता म्हणजे आपण मानवी मूल्यांचा विचार करायला हवा. मानवी विकासासाठी पोषक असणारी सर्व मूल्ये देशीयतेच्या विचारात येतात. मार्क्स, गांधी, फुले, आंबेडकरी विचार ह्यामध्ये येतो.

देशीयतेच्या संकल्पनेत डॉ.भालचंद्र नेमाडे हयांना दोन बृहत व्यवस्था अभिप्रेत आहेत. १. जातिव्यवस्था २. देशव्यवस्था. ह्या संदर्भात मधुकर वाकोडे म्हणतात की, ''एका विशिष्ठ भूमिपट्ट्यात वास्तव्य करणारा, त्या पट्ट्यातील भाषा बोलणारा, त्या मातीने आकार दिलेला सामान्य माणूस परंपरेने चालत आलेल्या जातीव्यवस्थेतील एक घटक असतो. जात आणि देश ही त्याची आधारभूत मूल्ये असतात. तिथल्या अन्नपाण्यावर जसा त्याचा पिंड घडलेला असतो, तसाच त्या परिसरातील ऋतुचक्र, नद्या, डोंगर, तीर्थक्षेत्र, उत्सव, यात्रा–जत्रा, लोकव्यवहारावर त्याची मानसिकता पोसलेली असते.''[४] यावरून आपणास भालचंद्र नेमाडे यांना अभिप्रेत असणाऱ्या, देशीयतेच्या संकल्पनेत जातीव्यवस्था आणि देशव्यवस्था हयांचा परस्पर संबंध परंपारागत असल्याचे दिसते. माणूस ह्या परंपरागत चालत येणाऱ्या व्यवस्थेचा एक घटक असतो. मुळातच जात आणि देशही त्याची आधारभूत मूल्ये असतात. परंपरागत चालत येणाऱ्या प्रथा–परंपरामुळे त्याची मानसिकता तयार झालेली असते. सण–उत्सवाच्या निमित्ताने स्त्रिया वेगवेगळया प्रकारची गीते म्हणतात त्यामधूनही देशीयतेचे चित्रण घडते. स्त्रियांची मानसिकता सण–उत्सवातून, लोकव्यवहारातून पोसलेली असते. त्या मानसिकतेचे प्रतिबिंब स्त्रीगीतातून उमटते. एकप्रकारे हया स्त्रीगीतामधून देशीयतेचे चित्रण उमटताना दिसते. स्त्री लोकगीतांधून प्रकटणारी भाषा त्या–त्या प्रदेशाची असल्याने, त्यामधून देशीयतेचे चित्रण घडते. लोकवाङ्‌मय निर्माण करणारा लोकसमूह ज्या परिसरातील आहे, त्या समूहाने मराठी भाषेचा अस्सलपणा जपला आहे. एकप्रकारे लोकवाङ्‌मयाने देशीय मूल्यांची पाठराखणच केली आहे.

मौखिक वाङ्‌मयामधून देशीय परंपरा अव्याहतपणे वाहताना दिसते. ह्या संदर्भात मधुकर वाकोडे म्हणतात की, ''लोकवाङ्‌मयात लोकभाषांचा परिमळ दरवळतो. ही निर्मिती निर्हेतुक असल्याने मातीचा गंध आणि लोकमानसाचा गहिरा रंग शब्दाशब्दांत जाणवतो. भाषेची सहजता, सुंदरता, लवचिकता आणि सुलभता लोकभाषांनाच लाभली आहे. खरे तर संत तुकारामानंतर आजतागायत लोकभाषांनीच मराठीचे प्राणतत्व जपले आहे.''[५] यावरून आपणास असे दिसून येते की, ज्या भूप्रदेशात आपली जडण–घडण हाते, ती देशीयता आपल्या तना–मनात, रक्तात भिनत असते. त्यामुळे मौखिक वाङ्‌मयामधून हया देशीयतेचे चित्रण सहजपणे अविष्कृत होताना दिसते. स्त्री लोकगीतांनी देशीयतेच्या अनेक तऱ्हा जपलेल्या आहेत. त्याचा परिचय पुढीलप्रमाणे करून घेता येतो.

## स्त्री लोकगीतांधून प्रकटणारी देशीयता :–

कोणत्याही देशाचा राजकीय इतिहास लिहिताना आपणास शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते, मुद्रितग्रंथांचा संशोधनासाठी साधन म्हणून वापर करावा लागतो. मात्र एखाद्या देशाचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास लिहायचा झाल्यास एवढीच साधने पुरेसी नसतात, समाजाच्या लोकनेणिवेतील भाव–भावनांचा, आशा–आकांक्षांचा, वृत्ती–प्रवृत्तींचा, रूढी–परंपरांचा मागोवा घेण्यासाठी सामूहिक लोकमाणस ज्या माध्यमातून व्यक्त झालेले असेल त्या माध्यमाचा शोध घ्यावा लागतो. त्यासाठी आपल्याला मौखिक अविष्काराचे माध्यम शोधावे लागते. स्त्रिया रोजचे दळण–कांडण करताना, सडा–सारवण करतानार, कृषी–कर्म करताना, जागरण–उपासना करताना, सण–उत्सव आणि विधी कर्म करताना सहज–स्वाभाविकपणे ही स्त्री लोकगीते म्हटली जातात. त्यामुळे हया स्त्री



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *
240
CamScanner

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

लोकगीतांमधून अस्सल देशीयतेचे दर्शन घडते. मुळातच ग्रामीण स्त्री ही परंपारप्रिय आणि धार्मिक वृत्तीची असते. अनेक बंधनांनी जखडलेल्या ग्रामीण स्त्रीला विधी, सण–उत्सवानिमित्ताने आनंदाचे क्षण अनुभवता येतात. सण–उत्सव प्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या गीतांमधून तिच्या मनातील भाव–भावना व्यक्त होतात. भारतीय परंपरेत सण–उत्सवांना महत्वपूर्ण स्थान आहे. अशा स्वरूपाचे सण–उत्सव साजरे केल्यामुळे निसर्गातील अद्‌भुत शक्तीला प्रसन्न करून त्याची कृपा संपादन करता येते. अशा समजूतीमधून हे सण–उत्सव साजरे केले जातात. कळत–नकळत हयामधून देशीयतेचे चित्रण घडत जाते.

ग्रामीण स्त्रियांचे जीवन 'कृषी व्यवस्थेशी निगडीत असल्याने त्यांना नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागते. त्यामुळे निसर्गशक्तीला प्रसन्न करण्यासाठी ग्रामीण स्त्रिया सण–उत्सव साजरे करताना दिसतात. ह्यासंदर्भात पुरुषोत्तम कालभूत म्हणतात, ''हिंदूधर्म म्हणजे नेमनियमांची शिकवण देणारा आपल्या प्रत्येक सणामागे प्रत्येक दिवसामागे कुठली तरी शिकवण असते. मोलाची सांगड त्यात घातलेली असते. त्याग, नीती, दया यांची शिकवण साध्या–सोप्या गोष्टीतून जोपासलेली दिसते. प्रत्येक सण एखादा संस्कार घडवून देतो. यात गौरीपूजा, हादगा, भोंडला, भुलाबाई, नागपंचमी, दिवाळी, तीळसंक्रांत, माडी, काजळतीज, वटसावित्री इत्यादींचा आवर्जून उल्लेख करता येईल.''[5] भारतीय सण उत्सवानां एकदा सुरूवात झाल्यावर वर्षभर प्रत्येक महिन्यात एखादा तरी सण असतोच, त्यामुळे भारतीय सण उत्सवामधून त्या देशाची परंपरा, संस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले असते. ह्या सण उत्सवाचे औचित्य साधून अनेक स्त्रिया लोकगीते म्हणताना दिसतात, त्या लोकगीतांधून त्या–त्या समाजाची संस्कृती दिसून येते. एकप्रकारे आपणास अस्सल देशीयतेचा प्रत्यय हया लोकगीतांमधून घडतो. भारतीय संस्कृतीमधील सणांची सुरूवात गुढीपाडव्याच्या सणांपासून होते. सर्व ऋतुंचा राजा म्हणून वसंत ऋतुचा उल्लेख केला जातो. चैत्र मास भूषविणारा गुढीपाडवा म्हणजे चैत्र शुध्द प्रतिपदा, हिंदू नववर्षाचा प्रारंभ असतो. मात्र हया दिवसाला पौराणिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. हया दिवशी अनेक स्त्रिया लोकगीते म्हणतात. त्यामधून आपणास देशीयतेचे अस्सल चित्रण घडते.

उदा.

''पाडव्याच्या दिवशी गं
बाई उठते लवकर
सडा सारवण करते अंगणी
पाडव्याच्या सनाला गं
गुढया उभारी दारोदारी.''

यावरून आपणास भारतीय संस्कृतीचे, प्रथा–परंपरांचे, सण–उत्सवाचे दर्शन घडते. सणाच्या दिवशी ग्रामजीवनात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण असते. अंगणात सडा–सारवण करण्याची प्रथा त्यावर रांगोळी काढण्याची प्रथा ह्यामधून देशीसंस्कृतीचे दर्शन घडते. गुढीपाडव्याच्या सणामधून देशीयता कशी प्रकटते ह्यासंदर्भात आपणास विवेक सावंत यांचे मत विचारात घ्यावे लागेल. ते म्हणतात, ''या दिवशी कडुलिंबाची पाने, हरबऱ्याची डाळ, ओवा, गूळ, मीठ यांचे मिश्रण वरवंट्यावर वाटून त्याचा प्रसाद परिवारातील सर्वांना दिला जातो. येणाऱ्या उन्हाळ्यात पाणी आणि उष्म्याने होणारे उदरविकार दूर करणारे हे औषध आहे. हे या सणामागील विज्ञान आहे. तसेच आंघोळीच्या पाण्यात कडुलिंबाचा वापर केल्यास सर्व प्रकारचे त्वचा रोग दूर होतात.''[6] ह्यावरून आपणास ह्या सणांचे महत्त्व लक्षात येते. या सणाच्या निमित्ताने ज्या–ज्या गोष्टींचे उल्लेख येतात त्यामधून देशी संस्कृतीचे दर्शन घडते. हया सणाच्या निमित्ताने प्रत्येक घरात पुरणपोळी, आमटी–भात, भजी, पापड, कुईइ, खीर इतर स्वयंपाक केला जातो. ह्यामधूनही देशीय संस्कृतीचे दर्शन घडते. नागपंचमीचा सण महाराष्ट्रात प्राचीन काळापासून साजरा केला जातो. ह्या सणाच्या दिवशी ग्रामीण भागात घराच्या भिंती मातीने सारवून, त्यावर नागाची चित्रे काढली जातात. पंचमीच्या सणानिमित्त स्त्रिया नवीन वस्त्र, अलंकार लेवून नागोबाला पुजण्यासाठी (वारूळाची पूजा) करतात. ही पूजा करताना सर्व स्त्रिया एकत्र येऊन गाच–गाणी करतात. ह्यामधून सासर, माहेर त्यामधील सुख–दुःखाचे प्रसंग सांगतात. ह्या स्त्रीगीतांच्या माध्यमातून स्त्रियांची मने आनंद–दुःखाच्या हिंदोळ्यावर बसून मोकळी होतात.

उदा.

''चल ग सये, चल ग सये वारूळाला
नागोबाला पुजायाला,



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

241

CS CamScanner

हळदकुंकू, वहायला, ताज्या लाहया वेचायला
या ग या सयांनो, या ग या मैतरणींनो
तेल्या तांबूळयाच्या बाई, वाण्या बामणाच्या बाई
जमूनिया साऱ्याजणी जाऊबाई न्हवणा
जिथ पाय ठेवू बाई, तिथ उठला दवणा.''

यावरून आपणास भारतीय संस्कृतीचे तर दर्शन घडतेच, पण स्त्री लोकगीतांमधून प्रकटणाऱ्या देशीयतेचेही चित्रण घडते, भारतीय हिंदू संस्कृतीमधील जातीयतेने वर्णन ह्यामधून येताना दिसते. ह्या लोकगीतामधून तांबोळी, बामण या जातीमधील स्त्रियांचे उल्लेख येताना दिसतात. भारतीय संस्कृतीत स्त्रियांना मुक्त स्वातंत्र्य नसल्याने अशा सणाच्या निमित्ताने त्या एकत्र येतात. गीताच्या माध्यमातून स्त्रिया स्वत:च्या मनात दडपलेल्या भावना व्यक्त करताना दिसतात. हया सणाबरोबरच श्रावण महिण्यात राखी पौर्णिमेचा सण असतो. ह्या सणाला श्रावणी पौर्णिमा, राखी पौर्णिमा, पोवती पौर्णिमा, रक्षाबंधनाची पौर्णिमा अशा वेगवेगळया नावांनी ह्या सणाला ओळखले जाते. हया सणाच्या दिवशी बहिण आपल्या भावाच्या हातात राखी बांधते. भावाने बहिणीचे रक्षण करावे, तसेच भावाचा विकास व्हावा ही सदिच्छा देऊन बहीण भावाला राखी बांधते. या संदर्भात हर्षे पु.वि. म्हणतात, ''उदेपूरची राणी कर्मवती हिने आपल्या पतीच्या निधनानंतर गुजरातच्या बहादुरशहापासून आपले संरक्षण व्हावे म्हणून मोगल बादशहा हुमायुन हयाच्या कडे राखी पाठविली व त्याच्याशी भावाचे नाते जोडून, त्याची मदत मागितली होती.''[८] (हर्षे पु. वि., 'सण आणि सुटया')

यावरूनसुध्दा रक्षाबंधनाची प्राचीन परंपरा दिसून येते. एकप्रकारे राखीचा सण हा देशीय जाणिवा व्यक्त करताना दिसतो. रक्षाबंधनाचा सण पराक्रम, प्रेम, मैत्री आणि असाहय्य व्यक्तींना संरक्षण मिळवून देणारा आहे. ह्या दिवशी अनेक स्त्रिया लोकगीते म्हणताना दिसतात.
उदा.

''सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती
ओवाळीते भाऊराया
वेडया बहिणीची वेडी ही माया''

भारतीय संस्कृतीत नातेसंबंधाला, कुटुंबपध्दतीला विशेष महत्व आहे. ह्या सण–उत्सवांमुळे ही नाती अधिकाधिक घट्ट झालेली दिसतात. परकीय देशामध्ये अशी कुटुंबपद्धती अस्तित्वात नाही. अशा स्वरूपाची नाती जोपासली जात नाहीत. त्यामुळे रक्षाबंधनाच्या सणाच्या माध्यमातून आपणास देशीयतेचे चित्रण घडते. रक्षाबंधनाचा सण बहीण–भावाच्या नात्याचा मधून सण आहे. राखीच्या नाजूक धाग्यात अतूट असे प्रेम आहे. 'गोकुळाष्टमी' सणाच्या निमित्ताने अनेक स्त्रिया एकत्र येतात. श्रीकृष्णाच्या जन्माचा उत्सव आनंदात–उत्साहात साजरा करतात. श्रीकृष्णाच्या लीला अबालवृध्दांना प्रिय आहेत. अशा प्रसंगी भजन, किर्तन, कृष्ण लीलेच्या नाटिका, नामजप, मंत्रघोष, स्त्रीगीते, म्हटली जातात. अशा उत्सवाच्या संदर्भात सावंत विवेक म्हणतात, ''महाराष्ट्रात मध्यरात्री पाळणे सजवून श्रीकृष्णाचा जन्मोत्सव अत्यंत धार्मिक भावनेने साजरा करतात. मथुरा, पुरी, गोवर्धन, द्वारका, जगन्नाथपूरी, वाराणसी येथील जन्माष्ठमीचा जल्लोष अनोखा असतो. जगभरातील पर्यटक हा सोहळा पाहायला या दिवशी येथे जमतात.''[९] यावरून आपणास भारतातील वेगवेगळया प्रदेशांची माहिती मिळते. हयामधूनही देशीयतेचे चित्रण घडते. हया प्रत्येक नावामधून आपणास देशीवादाच्या खुणा सापडतात. तसेच गोकुळाष्ठमीच्या निमित्ताने श्रीकृष्णावर आधारीत गीते म्हटली जातात. त्यामधूनही देशीवादाच्या खुणा पाहायला मिळतात.
उदा.

''बाई मी शिंपत होते अंगण
कृष्ण करीत होता कुंजन
कुणी धावा ग धावा
कृष्ण मंदिरी वाजवी पावा.....
बाई मी काढीत होते लोणी
कृष्ण मागत होता दही
कुणी धावा ग धावा
कृष्ण मंदिरी वाजवी पावा....''



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67

242

CS CamScanner

अशा कथागीताच्या माध्यमातून कृष्णाचे वर्णन केले आहे. कृष्ण हळूहळू लहानाचा मोठा होत गेल्यावर त्याच्या खोड्याही वाढत गेल्या. आपल्या बासरीच्या माध्यमाने त्याने गोकुळातील सर्व गोपिकांना वेड लावले. ह्या सर्व गोष्टीच्या पाऊलखुणा आपणास लोकगीतात आढळतात. एकप्रकारे ह्या लोकगीतामधून देशीवादाचे प्रतिबिंब उमटलेले आहे. भारतीय संस्कृती ही कृषी संस्कृती जोपासणारी संस्कृती आहे. भारतामध्ये ७० टक्के लोक शेती करतात. पुर्वीच्या काळी ग्रामजीवनात शेती करण्यासाठी बैलांचा वापर केला जात असे. त्यामुळे भारतीय कृषी संस्कृतीत 'पोळा' ह्या सणाला विशेष महत्व आहे. ग्रामीण स्त्रिया ह्या पोळयाच्या निमित्ताने स्त्रीगीते म्हणताना दिसतात. पोळा हा बैलांचा सण आहे. शेतकऱ्याच्या दृष्टीने बैल हे 'दैवत' आहे. बैल शेतकऱ्याला वर्षभर जगवतो. बैलांच्या मदतीने शेतकऱ्याचे शेत फळते, फुलते आणि बहरते. त्यामुळे शेतकरी कुटुंब पोळा ह्या सणाच्या निमित्ताने गीते म्हणतात.

उदा.

"बेंदूर हा सण श्रावण वद्य अमावस्येला आला,
सोलापूर, कर्नाटकात बेंदूर त्यास म्हणती,
भाद्रपदातील अमावस्येला साजरा तो होतो,
सातारा येथे आषाढात केला जातो."

अशा गीताच्या माध्यमातून वेगवेगळ्या परिसरातील गावांच्या नावाचा परिचय होतो. वेगवेगळ्या परिसरात ह्या सणाला वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. ह्यामधून खऱ्या अर्थाने देशीय संस्कृतीचे दर्शन घडते. ह्या संदर्भात मधुकर वाकोडे म्हणतात, "देशीयतेत लोकसंस्कृतीप्रमाणेच आणखी एक कृषीसंस्कृती अंतर्भूत असते. कृषी कर्मातील अवजारे....पण त्यांना पवित्रता देण्य जाणिवा बहाल करतात. त्यांचेही एक पारिवारिक नजीवन मानले जाते."[१०] कृषी संस्कृतीमधून देशीयतेच्या अनेक खुणा आपणास पाहावयास मिळतात. संबंध कृषी संस्कृती म्हणजे एकप्रकारे देशीयताच आहे. असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. सण—उत्सवाच्या स्त्रीगीतांमध्ये सोळा सोमवार, हरतालिका, नवरात्र उत्सव, दसरा, दिवाळी, मंगळागौर, गौरीपूजन, तुळशी विवाह, मकरसंक्रांत, महाशिवरात्री, होळी, रंगपंचमी, इतर सण—उत्सवानिमित्त स्त्रिया गीते म्हणतात. ह्या सबंध गीतांमधून भारतीय संस्कृतीचे दर्शन होते. ग्रामजीवनातील स्त्रीगीतांच्या माध्यमातून सण—उत्सवाची परंपरा टिकवून ठेवलेली आहे. हयामधून त्या—त्या समाजाच्या चालीरीतीचे दर्शन घडते. म्हणजे एकप्रकारे देशीयतेचेच दर्शन ह्या स्त्रीगीतामधून घडत असते.

## संदर्भग्रंथ

१) जाधव मनोहर (संपा.), "डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, गौरवग्रंथ, समकालीन साहित्यचर्चा", प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २ जून २०१०, पृ. ४०२.

२) कोत्तापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. सप्टें. १९९६, पृ.क्र. २५८, २५९.

३) तत्रैव, पृ.क्र. २६५, २६६.

४) जाधव मनोहर, उनि, पृ.क्र. ४०३.

५) जाधव मनोहर, तत्रैव, पृ.क्र. ४०६.

६) कालभूत पुरूषोत्तम, 'लोकसाहित्य : स्वरूप आणि विवेचन' विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १ जाने. २००७, पृ.क्र. ११८.

७) सावंत विवेक, 'आपले सण ', सरदार त्रिलोचन सिंह प्रकाशन, इन्दौर, प्र.आ. २००८, पृ.क्र. ४.

८) हर्षे पु.वि. 'सण आणि सुटया' (सर्वधर्माच्या), केशव ढवळे प्रकाशन, मुंबई, प्र.आ. ऑगस्ट १९७९, पृ.क्र. ६४.

९) सावंत विवेक, उनि, पृ.क्र. १४, १५.

१०) जाधव मनोहर, उनि, पृ.क्र. ४११.

❖❖❖

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune 67



243

CS CamScanner